**शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचारांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या मंजुरीबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक आरोग्य विभाग,

शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : १९ मार्च, २००५

वाचा :-
1. १) शासन निर्णय, सा.आ.वि.क्र.एमएजी १०९१/३४५६/प्र.क्र.३२०/९१/आ.७, दि.१४ जानेवारी, १९९३
2. २) शासन निर्णय, सा.आ.वि.क्र.एमएजी १०९९/प्र.क्र.४०/आ.३, दि.२९ जुलै, १९९९
3. ३) शासन शुध्दिपत्रक सा.आ.वि. क्र.एमएजी १०९९/प्र.क्र.४०/आ.३, दि.२५ फेब्रुवारी, २०००
4. ४) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी १०९५/प्र.क्र.४५/९५/आ.३, दि.४ जुलै, २०००
5. ५) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी १०९९/१३३३/प्र.क्र.२०१/आ.३, दि.२९ नोव्हेंबर, २००४
6. ६) आरोग्य सेवा संचालनालयाचे पत्र क्र. संआसे/आकस्मिक आजार/वैखप्र/मर्यादा/कक्ष-८ब/ कक्ष-१/०५, दि.३.१.२००५

**प्रस्तावना :-**

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१, मधील तरतुदींच्या अधिन राहून, आकस्मिक उद्भवणा-या २७ आजारांवर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील वैद्यकीय खर्चाची, वेतनगटानुसार अनुज्ञेय ठरविण्यांत आलेल्या टक्केवारीप्रमाणे परंतु प्रत्येक प्रकरणी रु.२०,०००/- च्या कमाल मर्यादेत प्रतिपुर्तीस मंजुरी देण्याचे अधिकार विभागप्रमुखांना आहेत. या मर्यादेवरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची प्रकरणे संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत सार्वजनिक आरोग्य विभाग व वित्त विभागाकडे विशेष बाब म्हणून मान्यतेच्यादृष्टीने सादर केली जातात. सद्यःस्थितीत औषधांच्या किमतीत व उपचार पध्दतीवरील खर्चामध्ये झालेली वाढ तसेच अशी प्रकरणे निकाली काढण्यास लागणारा कालावधी इत्यादींचा विचार करता प्रचलित कमाल मर्यादेत वाढ करणे व प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेय रकमेची परिगणना करण्यामध्ये सुलभता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी १०९९/प्र.क्र.४०/आ.३, दि.२९ जुलै, १९९९ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे :-

**१) औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपुर्ती :-** वेतनगटानुसार औषधोपचारावरील खर्चाच्या प्रतिपुर्तीची अनुज्ञेय रक्कम प्रस्तुत शासन निर्णयामधील तक्ता 'अ' मध्ये नमुद केली आहे. त्यामध्ये सुधारणा करण्यांत येऊन आता वेतनश्रेणीचे वर्गीकरण न करता औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% रक्कम सरसकट अनुज्ञेय राहील.

रोटा/एच-1137(3000-3-2005)-1

**२) खाजगी रुग्णालयातील वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती :-**

प्रस्तुत शासन निर्णयामधील तक्ता 'ब' मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे :-

**तक्ता 'ब'**

| अ. क्र. | खाजगी रुग्णालयातील वास्तव्याचा प्रकार | वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती करावयाचा प्रचलित दर | वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती करावयाचा सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १ | जनरल वॉर्ड (सर्वसामान्य कक्ष) | वेतनाच्या टप्याप्रमाणे ९० %, ८५%, ८०% | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ९५% अनुज्ञेय |
| २ | जनरल वॉर्डच्या (सर्वसामान्य कक्षाच्या) बाजूचा बाथरुम नसलेला कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ७५ % | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ९०% अनुज्ञेय |
| ३ | बाथरुमसह स्वतंत्र कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ६५ % | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ७५% अनुज्ञेय |
| ४ | बाथरुमसह डबल बेडेड कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ६० % | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ७५% अनुज्ञेय |
| ५ | बाथरुमसह वातानुकुलित कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ५० % | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ७५% |
| ६ | अतिदक्षता कक्ष (I.C.U.) | प्रत्यक्ष खर्चाच्या ५० % | १००% |

(**विशेष टिप :-** वरील तक्ता 'ब' मधील अनुक्रमांक ५ येथे नमुद केलेला बाथरुमसह वातानुकुलित कक्ष हा केवळ जे अधिकारी विमानप्रवासासाठी पात्र आहेत, त्यांना अनुज्ञेय राहील.)

**३) प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकारांबाबत :-**

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी १०९१/३४५६/प्र.क्र.३२०/९१/आ.७, दि.१४
जानेवारी, १९९३ प्रमाणे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची कमाल मर्यादा रु.२०,०००/- पर्यंत वाढविण्यात आली होती
व ही मर्यादा सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी १०९९/प्र.क्र.४०/आ.३, दि.२९ जुलै, १९९९ च्या श.
निर्णयास अनुसरुन शासन शुध्दिपत्रक सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी १०९९/प्र.क्र.४०/आ.३, दि.२५
फेब्रुवारी, २००० प्रमाणे उद्‌घृत करण्यात आली आहे. याबाबत आता पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे :-

१) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१, व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या
शासन निर्णयांमधील तरतुदींच्या अधीन राहून रु.४०,०००/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस
मंजूरीचे अधिकार संबंधित विभागांच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यांत येत आहेत.

२) प्रचलित पध्दतीनुसार रु.२०,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस एक विशेष बाब
म्हणून मंजुरी देण्याबाबतची प्रकरणे सार्वजनिक आरोग्य विभाग व वित्त विभागास सादर केली जात
होती, आता रु.४०,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा
(वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१, व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन
निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार
संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांना देण्यात येत आहेत.

३) विहीत तरतुदीत न बसणा-या प्रकरणी काही अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून
वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मान्यता द्यावयाची असल्यास अशाप्रकरणी निर्णय घेण्यासाठी

नमुद केल्याप्रमाणे समिती गठीत करण्यांत येत असून या समितीकडे अशी प्रकरणे निर्णयार्थ सादर करण्यांत यावीत :

| | | |
|---|---|---|
| अ) अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | -- | अध्यक्ष |
| ब) सचिव (व्यय), वित्त विभाग | -- | सदस्य |
| क) संबंधित प्रशासकीय विभागांचे सचिव | -- | सदस्य |
| ड) महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई | -- | सदस्य |
| ई) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | -- | सदस्य |
| फ) उप सचिव (रुग्णसेवा), सार्वजनिक आरोग्य विभाग | -- | सदस्य सचिव |

२. शासन याद्वारे असे निदेश देत आहे की, वर नमुद केल्याप्रमाणे विभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख या स्तरावर प्रकरणांना मंजुरी देताना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१, व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदी काटेकोरपणे तपासून मंजुरी देण्यात यावी.

३. हा शासन निर्णय प्रलंबित प्रकरणांनादेखील लागू करण्यांत यावा, मात्र यापुर्वीची निर्णयीत ठरलेली प्रकरणे पुन्हा सुरु करण्यांत येऊ नये.

४. शासन विर्निदिष्ट २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांची यादी परिशिष्ट 'अ' येथे व शासनमान्य खाजगी रुग्णालयांची यादी परिशिष्ट 'ब' येथे जोडण्यात आली आहे. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी हा शासन निर्णय त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यासने व कार्यालये यांना कळविण्याची व्यवस्था करावी.

५. हे आदेश महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाचे सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, मा.राज्यमंत्री, विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानमंडळाचे विद्यमान व माजी सदस्य, शासकीय कर्मचारी व या सर्वांचे कुटुंबिय यांना लागू राहतील.

६. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५८३/सेवा ५, दि.१७.३.२००५ नुसार निर्गमित करण्यांत येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( ला. म. चौधरी )
महराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति :- मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई
सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई
*सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मुख्यमंत्र्यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
*प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई

*प्रबंधक, मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
*प्रबंधक, मा.उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
सेटलमेंट कमिशन ॲण्ड डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्डस्, पुणे
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई
चीफ ऑडीटर, लोकल फंडस् अकाऊंटस्, मुंबई
कोषागार अधिकारी (सर्व)
महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
संचालक, आयुर्वेद, मुंबई
संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायोफार्मासिटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय(सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालये (सर्व)
वैद्यकीय अधिक्षक, शासकीय रुग्णालय (सर्व)
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
वित्त विभाग(सेवा ५ कार्यासन), मंत्रालय, मुंबई(१० प्रती)
सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई (५० प्रती)

२. हा शासन निर्णय मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणावा.

निवडनस्ती (आरोग्य ३)

* (पत्राने)

**शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आ.३, दि.१९ मार्च, २००५ चे सहपत्र**

## परिशिष्ट 'अ'

**शासन विर्निदिष्ट २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांची यादी.**

१) हृदयविकाराचा झटका (Cardiac emergency) प्रमस्तिक संहनी (cerabral vascular) फुफ्फुसाच्या विकाराचा झटका (Pulmonary emergency)/ ॲन्जिओग्राफी चाचणी
२) अति रक्तदाब (Hypertension)
३) धनुर्वात (Titanus)
४) घटसर्प (Diphtheria)
५) अपघात (Accident) आघात संलक्षण (Shock Syndrome) हृदयांशी आणि रक्तवाहिनीशी संबंधीत (Cardiological and Vascular)
६) गर्भपात (Abortions)
७) तीव्र उदर वेदना/आंत्र अवरोध (Acute abdominal pains/Intestinal obstruction)
८) जोरदार रक्तस्त्राव (Severe haemorrhage)
९) गॅस्ट्रो--एन्ट्रायटिस (Gastro--Entrietis)
१०) विषमज्वर (Typhoid)
११) निश्चतेनावस्था (Coma)
१२) मनोविकृतीची सुरुवात (Onset of psychiatric disorder)
१३) डोळ्यातील दृष्टीपटल सरकणे (Retinal detachment in the eye)
१४) स्त्रीरोगशास्त्र आणि प्रसुतीशास्त्र संबंधित यांच्याशी आकस्मिक आजार (Gynaecological and obstetric emergency)
१५) जननमुत्र आकस्मिक आजार (Genito - urinary emergency)
१६) वायू कोथ (Gas Gangrine)
१७) कान, नाक किंवा घसा यामध्ये विजातीय पदार्थ गेल्यामुळे निर्माण झालेले आकस्मिक आजार (foreign body in ear, nose or throat emergency)
१८) ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती (Cogenital Anamolies requiring urgent surgical intervention)
१९) ब्रेन ट्युमर (Brain Tumour)
२०) भाजणे (Burns)
२१) इपिलेप्सी (Epilepsy)
२२) ॲक्यूट ग्लॅकोमा (Acute Glaucoma)
२३) स्पायपनस स्कॉड (मज्जारज्जू) संबंधात आकस्मिक आजार
२४) उष्माघात
२५) रक्तासंबंधातील आजार
२६) प्राणी चावल्यामुळे होणारी विषबाधा
२७) रसायनामुळे होणारी विषबाधा

गंभीर आजार- भाग २

१) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे (Heart Surgery)
२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया (Bye pass Surgery)
३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया
४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया (Kidney Transplantation)
५) रक्ताचा कर्करोग (Blood Cancer)

*******

रोटा/एच–1137(3000–3–2005)–3

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी २००५/९/प्र.क्र.९/आ.३, दि.१९ मार्च, २००५ चे सहपत्र

परिशिष्ट "ब"

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्टोपचारावरील खर्चाची शासकीय रुग्णालयांप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्ययावत यादी.

----------

| क्र. | आजाराचे नाव | शासन मान्य संस्थेचे नांव |
|---|---|---|
| १ | हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया व हृदयावरील इतर शस्त्रक्रिया | १) सदर्न रेलवेज, हेडक्वार्टर्स हॉस्पिटल, पेराम्बूर, मद्रास |
| | | २) ख्रिश्चन मेडिकल कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल, बेल्लोर |
| | | ३) के.ई.एम.रुग्णालय, मुंबई |
| | | ४) जसलोक हॉस्पिटल, मुंबई |
| | | ५) बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई |
| | | ६) कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ |
| | | ७) श्री.चित्राई तिरुनल इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस अॅण्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम |
| | | ८) कंबाला हिल हॉस्पिटल अॅण्ड हार्ट इन्स्टिट्युट, मुंबई |
| | | ९) एन.एम.वाडीया इन्स्टिट्युट ऑफ कार्डीयालॉजी, पुणे |
| | | १०) रुबी हॉल क्लिनीक, पुणे |
| | | ११) डॉ.के.जी.देशपांडे मेमोरियल सेंटर, नागपूर |
| | | १२) सेंट्रल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर |
| | | १३) जी.बी.पंत हौस्पिटल, नवी दिल्ली |
| | | १४) पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्युट, चंदिगड |
| | | १५) ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली |
| | | १६) एसएसकेएम हॉस्पिटल, कलकत्ता |
| | | १७)डॉ.इनामदार हॉस्पिटल, पुणे |
| | | १८)दिनदयाळ नॅशनल हॉस्पिटल, पुणे |
| | | १९)सीम्स हॉस्पिटल, नागपूर |
| | | २०)कमलनयन बजाज रुग्णालय, औरंगाबाद |
| | | २१)राजेबहाद्दूर हार्ट फौंडेशन प्रा.लि.नाशिक |
| | | २२)अवंती इन्स्टिट्युट ऑफ कार्डिऑलॉजी, नागपूर |
| | | २३)हिलिंग टच अॅन्जिओग्राफी अॅण्ड कार्डिक सर्जरी सेंटर, नाशिक |
| | | २४)ऑरेंज सिटी हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्युट |
| | | २५)स्पंदन हार्ट इन्स्टिट्युट आणि रिसर्च सेंटर, नागपूर |
| | | २६)गिरिराज हॉस्पिटल अॅण्ड इन्सेंटिव्ह केअर युनिट, बारामती, पुणे |
| | | २७)दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, पुणे |
| | | २८)काळबांडे हार्ट अॅण्ड चेस्ट हॉस्पिटल, औरंगाबाद |
| | | २९)अर्नेजा हार्ट इन्स्टिट्युट, नागपूर |
| | | ३०)क्रिसेंड नर्सिंगहोम आणि इंटेन्सिव्ह कार्डियाक केअर युनिट, नागपूर |
| | | ३१)जळगांव हार्ट इन्स्टिट्युट लिमिटेड द्वारा संचलित इंडो अमेरिकन कार्डिओव्हॅस्क्युलर सेंटर जळगांव. |

| | | |
|---|---|---|
| | | ३२)एशियन हार्ट इन्स्टिट्युट, बांद्रा, मुंबई |
| | | ३३)सरस्वती मेडिकल फौंडेशन अॅण्ड रिसर्च सेंटर, कोल्हापूर |
| | | ३४)पुना हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, पुणे |
| २ | मुत्रपिंड प्रतिरोपण | १) ख्रिश्चन मेडिकल कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल, बेल्लोर |
| | | २) ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली. |
| | | ३) पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्युट, चंदिगड |
| | | ४) जसलोक हॉस्पिटल, मुंबई |
| | | ५) रुबी हॉल क्लिनीक, पुणे |
| | | ६)सोलापूर किडनी केअर सेंटर अॅण्ड रिसर्च सेंटर, सोलापूर |
| | | ७)कमलनयन बजाज रुग्णालय, औरंगाबाद |
| | | ८)राधिकाबाई मेघे मेमोरियल मेडिकल ट्रस्ट जवाहरलाल नेहरु वैद्यकीय महाविद्यालय व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय वर्धा |
| | | ९)इन्स्टिट्युट ऑफ युरॉलॉजी, पुणे |
| | | १०)क्रिसेंड नर्सिंगहोम आणि इंटेन्सिव्ह कार्डियाक केअर युनिट, नागपूर |
| | | ११)के.ई.एम.रुग्णालय, पुणे |
| | | १२)पुना हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, पुणे |
| | | १३)डॉ.राघोजी किडनी हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर प्रा.लि.सोलापूर |
| ३ | रक्ताचा कर्करोग व इतर कर्करोग | १) टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई |
| | | २) कॅन्सर इन्स्टिट्युट, अडयार, मद्रास |
| | | ३) इंडीयन कॅन्सर इन्स्टिट्युटच्या महाराष्ट्रातील सर्व संस्था (असल्यास) |
| | | ४) बालाभाई नानावटी रुग्णालय, मुंबई |
| | | ५) कॅन्सर रिलीफ सोसायटी, नागपुर |
| | | ६) अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च अॅण्ड रिलीफ सोसायटी, बार्शी |
| | | ७) श्री.सिध्देश्वर कॅन्सर सोसायटी, सोलापूर |
| | | ८) कॅन्सर इन्स्टिट्युट, अडयार, मद्रास |
| | | ९) संत तुकाराम मेडीकल रिसर्च सेंटर, महर्षी दयानंद मार्ग, अकोला |
| | | १०)दिनदयाळ नॅशनल हॉस्पिटल, पुणे |
| | | ११)शेठ नंदलाल धुत रुग्णालय, औरंगाबाद |
| | | १२)हेमोटॉलॉजी क्लिनिक, प्रयोगशाळा व रुग्णालय, नागपूर |
| | | १३)उध्दव मेमोरियल हॉस्पिटल, नाशिक |
| | | १४)राधिकाबाई मेघे मेमोरियल मेडिकल ट्रस्ट जवाहरलाल नेहरु वैद्यकीय महाविद्यालय व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय वर्धा |
| | | १५)दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, पुणे |
| | | १६)डॉ.रविंद्र कोडलीकर हॉस्पिटल, औरंगाबाद |
| | | १७)काळबांडे हार्ट अॅण्ड चेस्ट हॉस्पिटल, औरंगाबाद |
| | | १८)दौलत मेमोरियल हॉस्पिटल, औरंगाबाद |
| | | १९)बगाडीया हॉस्पिटल, अकोला |
| ४ | लहान मुलांचे आजार | १)बाई जेरबाई वाडीया रुग्णालय, मुंबई |
| | | २)दौलत मेमोरियल हॉस्पिटल, औरंगाबाद |

| | | |
|---|---|---|
| ५ | ऑर्थोपेडीक उपचार | १) ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, महालक्ष्मी, मुंबई |
| | | २) ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ फिजीकल मेडीसीन अॅण्ड रिहॅबिलिटेशन, महालक्ष्मी, मुंबई |
| | | ३)म्हशाळकर शिंदे ऑर्थोपेडिक सेंटर अॅण्ड अॅक्सीडेंट सेंटर, सांगली |
| | | ४)शुअरटेक अपोलो मेडिकल सेंटर, नागपूर |
| | | ५)कर्ण हॉस्पिटल, सातारा |
| | | ६)डॉ.पी.बी.मगदूम ऑर्थोपेडीक सर्जन ट्रामा केअर हॉस्पिटल, मिरज, जि.सांगली |
| | | ७)डॉ.अशोक पाटील क्लिनिक, सांगली |
| | | ८)देसाई अॅक्सिडेंट अॅण्ड जनरल हॉस्पिटल, भोसरी, पुणे |
| ६ | मधुमेह | रहेजा रुग्णालय, मुंबई |
| ७ | मणक्याचे विकार, खुब्याचे विकार, वेदनायुक्त सांध्याचे विकार व ते बदलण्याची शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे गुडघ्याच्या विकाराचे निदान व उपचार | १) संचेती इन्स्टिट्युट फॉर ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन, पुणे |
| | | २) स्वास्थीयोग प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट फॅक्चर अॅण्ड ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, मिरज |
| | | ३) सुश्रुत मेडीकल केअर अॅण्ड रिसर्च सोसायटीचे हर्डीकर हॉस्पिटल, पुणे |
| | | ४) सुश्रुत हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, नागपूर |
| | | ५) म्हशाळकर शिंदे ऑर्थोपेडिक सेंटर अॅण्ड अॅक्सीडेंट सेंटर, सांगली |
| | | ६) स्वास्थीयोग प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट, मिरज |
| | | ७) पुना हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, पुणे |
| | | ८) साईनाथ ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, भोसरी, पुणे |
| ८ | कॉम्प्युटराईज्ड रेस्टींग इलेक्ट्रोकार्डिओग्राम | डॉ.शशांक सुभेदार नॅशनल हार्ट सेंटर अॅण्ड क्लिनिक, नागपूर (या रुग्णालयास निरनिराळ्या चाचण्यांच्या संदर्भात मान्यता दिलेली आहे.) |
| | कॉम्प्युटराईज्ड ट्रेडमील स्ट्रेस टेस्ट | |
| | व्हेक्टीरोकार डायग्राम | |
| | कलर डॉपलर एको कार्डीओग्राफी | |
| | परमनन्ट पेसमेकर अॅनालायसेस | |
| | अॅम्बुलेटरी व्होल्टर मॉनिटरींग | |
| ९ | पोलिओ अस्थिव्यंगोपचार | ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ फिजीकल मेडिसीन अॅण्ड रिहॅबिलीटेशन, महालक्ष्मी, मुंबई |
| १० | मेंदुवरील शस्त्रक्रिया व उपचार | १)अश्विनी सहकारी रुग्णालय, सोलापूर |
| | | २) कमलनयन बजाज रुग्णालय, औरंगाबाद |
| | | ३)शुअरटेक अपोलो मेडिकल सेंटर, नागपूर |
| | | ४)पुणे इन्स्टिट्युट ऑफ युरॉलॉजी, पुणे |
| | | ५)एस.पी.इन्स्टिट्युट ऑफ न्युरोसायन्स, सोलापूर |
| | | ६)गिरिराज हॉस्पिटल अॅण्ड इन्सेटिव्ह केअर युनिट, बारामती, पुणे |
| | | ७)लोटस हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, कोल्हापूर |
| | | ८)पुना हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, पुणे |
| | | ९)लाईफ लाईन हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, नाशिक |
| | | १०)शिरोडकर हॉस्पिटल ट्रस्ट, डोंबिवली |
| | | ११)देसाई अॅक्सिडेंट अॅण्ड जनरल हॉस्पिटल, भोसरी, पुणे |

--------